प्रशासकीय मान्यता-

हिमायतनगर, जि.नांदेड येथे नवीन न्यायालयीन इमारत (तळ मजला) बांधण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग,
शासन निर्णय क्र.सीसीबी-१११८/प्र.क्र.१२६/का-१३,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- २७ मे,२०१९.

पहा :-१) प्रबंधक (निरिक्षणे-२), उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई यांचे क्र.बी (डब्ल्यू) ६०५३२/१९९७, दि. २१ जून,२०१७ चे पत्र.
२) प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड, यांचे क्र.बांध/२८३/२०१८, दि.१०/०१/२०१८ चे पत्र.

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ च्या पत्रान्वये, हिमायतनगर, जि.नांदेड येथे नवीन न्यायालयीन इमारत (तळ मजला) बांधण्याबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून शासनास सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

हिमायतनगर, जि.नांदेड येथे नवीन न्यायालयीन इमारत (तळ मजला) बांधण्याकरिता रु.९,०२,०१,०००/- (रुपये नऊ कोटी दोन लक्ष एक हजार फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास (खाली नमूद केलेल्या विगतवारीनुसार) या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	तपशिल	रक्कम रूपये
अ)	**आवश्यक बाबी**	
१	बांधकामाचा खर्च	४,२७,१७,२१०/-
२	विद्युतीकरण	
	अंतर्गत विद्युतीकरण (बांधकाम खर्चाच्या ५%)	२१,३५,८६१/-
	बाहय विद्युतीकरण (बांधकाम खर्चाच्या ६%)	२५,६३,०३३/-
३	पाणीपुरवठा व मलनिस्सारण (बांधकाम खर्चाच्या ५%)	२१,३५,८६१/-
४.	**संकिर्ण बाबी**	
	सरंक्षण भिंत	४५,००,०००/-
	अंतर्गत सी.सी. रस्ते	२०,००,०००/-
	सी. सी. ड्रेन्स	१२,००,०००/-
	फर्निचर	६५,००,४४५/-

	रेन वॉटर हार्वेस्टींग	४,२७,१७२/-
	अग्निशमन यंत्रणा सुविधा	८,५४,३४४/-
	गॅरेज	१०,००,०००/-
	भू-विकास	३,००,०००/-
	प्लिंथ प्रोटेक्शन	३,००,०००/-
	माती परिक्षण	१,००,०००/-
(ब)	**वैकल्पिक बाब**	
१	वॉटरमेन स्टोरेज, पंप हाऊस, इत्यादी.	१०,००,०००/-
२	सोलर एनर्जी सिस्टिम	५,००,०००/-
३	वातानुकुलित यंत्र	२,००,०००/-
४	बाह्य स्वच्छतागृह	१०,००,०००/-
५	लँडस्केपिंग अँड गार्डनिंग	१०,००,०००/-
	एकूण (अ) + (ब)	**७,०४,३३,९२६/-**
	आकस्मिक खर्च (बांधकाम खर्चाच्या ४%)	२१,३५,८६१/-
	ग्रीन बिल्डींग कॉन्सेप्ट	२१,३५,८६१/-
	वस्तू व सेवा कर १२ %	८४,५२,०७१/-
	भाववाढ (१० %)	७०,४३,३९२/-
	एकूण प्रकल्प खर्च रुपये -	**९,०२,०१,१११/-**
	म्हणजेच एकूण रुपये -	**९,०२,०१,०००/-**

२. **ही प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.**

अ) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरु करावे.

ब) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतुदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३ /प्र.क्र.१७७/ तां.क.१, दि. १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) काम सुरू करण्यापुर्वी सर्व संबंधित स्थानिक संस्था/प्राधिकरणे यांची मान्यता घेण्यात यावी.

इ) सावर्जनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/ इमारती-२, दि. ०७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

ई) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

फ) काम सुरू करण्यापुर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करून घ्यावी.

३. या प्रित्यर्थ होणारा खर्च “मागणी क्र.एच-८, ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च-०१, कार्यालयीन इमारती-०५१, बांधकाम-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०३) न्यायदान (केंद्रपुरस्कृत योजना-राज्य हिस्सा), योजनांतर्गत, (०३) (०१) मोठी बांधकामे, ५३ मोठी बांधकामे (४०५९०६७२) व (२१) न्यायदान (केंद्रपुरस्कृत योजना- केंद्र हिस्सा), (२१) (०१) मोठी बांधकामे, ५३ मोठी बांधकामे (४०५९१२२२)" लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. मात्र, **अर्थसंकल्पात तरतूद केल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.**

४. हे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-३६४/इमा-२, दि.०७.०८.२०१८ अनुसार त्या विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभाग शासन निर्णय क्र:-विअप्र २०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२ दि.१७ एप्रिल,२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये संबंधित सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०३११४८२०५११२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

KAWADU MAHADEO NIMJE

Digitally signed by KAWADU MAHADEO NIMJE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=d534ed26b170cf083fc036cec1eb71b53af888f9d1d19ab535e3731c0e6b6ccd, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=50937a061419ea12c61b63f5bef9bd56ffdb00d7531940b43c7e5e8c88731eac, ou=DESK 13, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KAWADU MAHADEO NIMJE
Date: 2019.06.03 12:10:55 +05'30'

(क. म. निमजे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. सभापती, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३. मा. विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/ विधानसभा ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४. महाप्रबंधक, उच्च न्यायालय , मुंबई,
५. उप प्रबंधक बी (डब्ल्यू) शाखा, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
६. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-दोन, नागपूर,
८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद,
९. अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड,
१०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर,
(मूळ अंदाजपत्रक व आराखडे यांच्यासह)
११. उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हिमायतनगर,
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड,
१३. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१४. वित्त विभाग/व्यय-५, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

१५. नियोजन विभाग,१४४३, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१६. अपर आयुक्त व सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, १८ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर,मुंबई ४०० ०३२.
१७. महासंचालक , माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१८. कक्ष अधिकारी, का.७, ११ व १२,विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
१९. निवड नस्ती/संग्रहार्थ.